# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

---

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/ १०/२०१४-१५/७३ दिनांक : ०७.०६.२०१४

**<u>अंतरिम आदेश केस क्र.१०/१३-१४</u>**

श्री.दिलीप लक्ष्मण पोवार,
मु.पो.पाडळी खुर्द,ता.करवीर,
जिल्हा - कोल्हापूर.

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, कोल्हापूर.

२) कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, ग्रामीण - १,कोल्हापूर.

विरुध्द पक्षकार

**कोरमः-** १. श्री.बी.जी.पवार,अध्यक्ष
२. श्री.जी.सी.लेले,सदस्य

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**
**(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)**
**विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार**

**<u>न्याय निर्णय</u>**

श्री.बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री.दिलीप लक्ष्मण पोवार, यांनी मंचाकडे दि.१६.०५.२०१४ रोजी वितरण कंपनीच्या विभागीय कार्यालय, ग्रामीण - १, कोल्हापूर, व उपविभागीय कार्यालीय,फुलेवाडी,यांचेविरुध्द बंद झालेले वीज कनेक्शन चालू करुन मिळण्यासाठी मागणी केली आहे. ग्राहकाने वितरण कंपनीकडून गट क्र.११५/२ ब येथे कृषी पंप वीज कनेक्शन घेतले आहे. दि.०३.०५.२०१४ रोजी बंद करण्यात आले आहे. विधी सल्लागार, पुणे, यांनी सदरचे कनेक्शन बंद करु नये असे मत दिले होते. ग्राहकाने लाईट बील रु.४,६००/- भरले आहे. वितरण कंपनीची कृती योग्य नाही. हरकतदार श्री.विष्णू पोवार यांनी आपला हक्क दिवाणी कोर्टात सिध्द करुन घ्यावा. वितरण कंपनीस सदर अर्जावर त्यांचे म्हणणे देण्यास नोटीस दिली.

प्रस्तुत केसची सुनावणी मंचाकडे दि.२६.०५.२०१४ रोजी झाली. तक्रारदाराचा मुलगा व वितरण कंपनीतर्फे श्री.आहुजा उपस्थित होते. तक्रारदारतर्फे त्याच्या मुलाने असे सांगितले की जुलै,१३ ला कनेक्शन सुरु झाले असून काही वाद उत्पन्न झालेने वितरण कंपनीने आपल्या विधी सल्लागार यांचे मत मागविले. त्यात असे वीज कनेक्शन बंद करु नये असे मत दिले. तरी वितरण कंपनीने वीज पुरवठा खंडित केला तो पूर्ववत (Restore) करुन मिळावा. सुनावणी दरम्यान विचारणा केली असता ग्राहकाने नमुना ८अ उतारा हजर केला. त्यासोबत ७/१२ हजर केला. वितरण कंपनीचे अधिकारी श्री.आहुजा यांनी व श्री.टांकसाळे, ज्यु.लॉ.ऑफिसर, यांनी सुनावणीत भाग घेतला. स्थानिक अधिकारी यांनी मा.तहसिलदार यांच्या आदेशानुसार वीज कनेक्शन खंडित केले आहे. त्याबाबत पुणे येथील विधी सल्लागार यांच्या अभिप्रायासाठी प्रकरण पाठविले आहे. त्याची प्रतिक्षा आहे. सुनावणीदरम्यान दि.२५ मार्च,२०१४ चे मा.तहसीलदार यांचे सहाय्यक अभियंता यांना अग्रेषित केलेले पत्र/आदेश दाखविले. ते आज दि.२७.०५.२०१४ रोजी मिळाले. त्यांनी मंचास मा.सदस्य सचिव यांच्याकडे दिले. त्या आदेशाचे अवलोकन करता सहहिस्सेदाराची संमती घेणे आवश्यक आहे. तसे केलेले दिसत नाही. म्हणून सदरचे कनेक्शन तात्काळ बंद करुन अन्य सहहिस्सेदारांची संमती घेतलेनंतर सुरु करावे असे आदेश दिले आहेत. ग्राहकाने सदरच्या आदेशाबाबत योग्य त्या कोर्टाकडे RTS proceding न करता मंचाकडे दि.०८.०५.२०१४ रोजी अंतर्गत कक्ष,कोल्हापूर यांच्याकडे परिशिष्ट क्ष मध्ये तक्रार केली.

वितरण कंपनीने आपल्या २६.०५.२०१४ च्या लेखी अहवालाच्या पत्रासोबत तक्रारदाराचा दि.०१.०९.२०१२ चा वीज मागणीचा अर्ज, यामध्ये गट क्र.११५/२ब येथे वीज मागणीचा उल्लेख असलेला २०१०/११ चा त्याच सर्व्हे नं.चा ७/१२ उतारा जोडला आहे. त्यामध्ये अर्जदार याचे एकट्याचेच नाव आहे. तक्रारदार यांनी मा.तहसीलदार यांच्या दि.२५.०३.२०१४ च्या आदेशाचा काही खुलासा केला नाही. २०१२-१३ सालाच्या ७/१२ मध्ये फेरफार उतारा क्र.७९७५ हजर करण्यास सांगितले. तो हजर केला नाही.

खालील मुद्दा न्यायनिर्णयासाठी मंचाकडे उपस्थित होतो.

**मुद्दा क्र.१:** तक्रारदाराने मागणी केलेला वीजपुरवठा पुर्ववत सुरु करुन देणे योग्य होईल काय?
**उत्तर :** नाही.

## कारणमिमांसा

उभय बाजुच्या लेखी व तोंडी कथनानुसार व कागदपत्रावरुन अर्जदाराने दि.०१.०९.२०१२ रोजी वीज मागणीचा अर्ज दिला आहे. परंतु ७/१२चा उतारा वर्ष २०१०-११ चा जोडला आहे. त्यात एकट्याचे नाव आहे. विहीर क्षेत्र २ गुंठे दाखविले आहे. मा.वीज नियामक आयोगाने मंजुर केलेल्या सप्लाय कोड अधिनियम २००५ मधील कलम ४ नुसार परंतुकामध्ये क्लॉज ब नुसार वीज परवानाधारकाच्या जागेवर वीजपुरवठा सुरु करतांना जी कागदपत्रे आवश्यक असतात, ती ज्या कायद्यानुसार लागतात त्या कायद्यातील विशिष्ट तरतुद असलेली यादी देण्यात यावी. या ठिकाणी एक गोष्ट स्पष्ट होते की सहहिस्सेदाराची संमती आवश्यक नाही. विद्युत पुरवठा अधिनियम २००५ नुसार शेतीपंपासाठी वीज जोडणी मागणी अर्ज A-1मध्ये उपकलम ई नुसार ७/१२ चा उतारा जोडणे आवश्यक आहे. दि.०१.०९.२०१२ रोजी अर्ज केला म्हणजे वर्ष २०११-१२ चा ७/१२ जोडणे आवश्यक आहे. त्याऐवजी वर्ष २०१०-११ चा जोडला आहे. वर्ष २०१२-१३ सालाच्या ७/१२ डायरी क्र.७९७५ नुसार तक्रारदाराव्यतिरिक्त अन्य १०-११ लोकांची नांवे आहेत. वितरण कंपनीच्या अधिका-यांनी अर्ज स्विकारतांना सप्लाय कोडमधील A-1फॉर्ममधील तरतुदीनुसार अर्जाची योग्य छाननी न करता जुन्या २०१०-२०११ च्या ७/१२ वर विसंबून जोडणी दिली आहे. सप्लाय कोडनुसार इतर हिस्सेदारांची संमती आवश्यक नाही. त्याप्रमाणे ग्राहकाने मा.तहसीलदार,करवीर यांचा आदेशाबाबत योग्य त्या कोर्टात दाद मागावी. ह्या आदेशास पूर्वीच आव्हान देणेआवश्यक होते.

मंचाचे असे मत झाले आहे की वीजजोडणी योग्यरित्या कागदपत्रांची पुर्तता न करता दिल्याने परत वीज जोडणीची मागणी फेटाळणे योग्य होईल. कारण अर्जदाराने वितरण कंपनीला सर्व सत्य घटना अर्जासोबत कळविल्या नाहीत. त्यामुळे मुद्दा नं.१ चे उत्तर **नाही** असे देण्यात येते.

तक्रारदार यांनी मा.तहशीलदार करवीर यांचा आदेश योग्य त्या न्यायालयात रद्द करुन घेणे त्यांचे हिताचे आहे. केवळ कंपनीच्या कायदेशीर सल्लागाराच्या मतावर (opinion) अवलंबून राहून वीज जोडणी सुरु करण्याचा आदेश देणे योग्य होणार नाही.

## **आदेश**

१. तक्रार फेटाळण्यात येत आहे.

२. सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

३. या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ७.६.२०१४

सही/-
(बी.जी.पवार)
अध्यक्ष

श्री.जी.सी.लेले, ग्राहक सदस्य .. सही/-

एकमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

सही/-
(बी.जी.पवार)
अध्यक्ष